## प्रसिध्दी पत्रक

दिनांक :२५/०६/२०२३

**लोकसेवक सुर्यकांत मारोती कांबळे, पद – पोलीस उप निरीक्षक नेमणुक पोलीस स्टेशन मनाठा यांनी दाखल गुन्हयामध्ये ब वर्ग अहवाल पाठविण्यासाठी ३०,०००/– रुपयाची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे भाग्यनगर गु.र.नं २४४/२०२३ कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दि. २५.०६.२०२३ रोजी ०२.१५ स्टे.डा. नोंद नं.०३ |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | सुर्यकांत मारोती कांबळे, वय ५६ वर्ष, व्यवसाय नोकरी, पद– पोलीस उपनिरीक्षक, सध्या नेमणूक पोलीस स्टेशन मनाठा, ता. हदगाव जिल्हा नांदेड, रा. मायादेवी नगर शिव रोड तरोडा (बु) ता. जि. नांदेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/– रूपयांची मागणी करून पडताळणी दरम्यान पंचासमक्ष ५०,०००/– रूपयांची मागणी |
| लाच स्विकारली रक्कम | तडजोडी अंती ३०,०००/–रू. पंचासमक्ष स्विकारले |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे पोकलेनच्या कॅबीन मधून १,३६,७००/– रूपये चोरीला गेले होते. त्याबाबत पो.स्टे. मनाठा जि. नांदेड येथे गुरनं ५६/२३ कलम ३८१ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असून नमूद गुन्हयाचा तपास आरोपी लोकसेवक हे करित आहेत.<br>नमूद गुन्हयातील चोरी गेलेले १,३६,७००/– रूपये हे चार दिवसानंतर पोकलेनच्या कॅबीनमध्येच मिळून आले याबाबत तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक यांना सांगितले असता त्यांनी आमचे काय असे म्हणुन एक लाख रूपयांची मागणी केली. पैसे दिल्यास सदर गुन्हयात 'ब' वर्गात अखेर अहवाल पाठवितो, पैसे नाही दिले तर ४२० भादंवि प्रमाणे तुम्हाला आरोपी करतो असे म्हणून लाचेची मागणी केली.<br>तक्रारदार यांनी सदर बाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे सदर बाबत तक्रार दिली. त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कडुन लाच मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक यांनी शासकीय पंचासमक्ष ५०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३०,०००/– रूपये स्विकरण्याचे मान्य केले. सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक यांनी तडजोडीअंती ठरलेले ३०,०००/– रूपये लाचेची रक्कम शासकीय पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड चे डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक,यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी श्री राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक तसेच सापळा कार्यवाही पथक अरविंदकुमार हिंगोले, पोलीस निरीक्षक, पोना/राजेश राठोड, पोकॉ/खदीर सय्यद, पोकॉ/ईश्वर जाधव, चापोहेकॉ/मारोती सोनटक्के सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | श्री अरविंदकुमार हिंगोले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फी कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@gmail.com | dyspacbnanded@gmail.com |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner